# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर

## संयुक्त विद्यमाने

## बी.ए. भाग-२ सेमिस्टर ३ पेपर नं. ३ (मेजर)

## शारीरिक शिक्षण सुधारित अभ्यासक्रमाची कार्यशाळा

## अहवाल

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतरविद्याशाखीय अभ्यासशाखेकडून सन २०२५-२६ मध्ये नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP) अभ्यासक्रम सुधारित केलेल्या वर्गांच्या सुधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालयीन शिक्षकांचे प्रशिक्षण शिबिर तथा कार्यशाळा मंजूर झाल्या त्याअंतर्गत बी. ए. भाग २ शारीरिक शिक्षण (ऐच्छिक) विषयाच्या सुधारित अभ्यासक्रमाची कार्यशाळा महात्मा फुले शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर मधील शारीरिक शिक्षण विभागास मंजूर झाली होती. सोमवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी सदर कार्यशाळेचे आयोजन कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर मधील शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने G-१४ मध्ये करण्यात आले. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या कक्षेतील तीनही जिल्ह्यात ज्या ठिकाणी शारीरिक शिक्षणाची विषय बी. ए. भाग २ च्या वर्गासाठी अध्यापनास आहे, त्या महाविद्यालयातील सर्व अध्यापकांना याबाबत पत्राद्वारे निमंत्रित करून येण्यास सूचित केले गेले. तसेच सदर सुधारित अभ्यासक्रमातील सेमिस्टर ३ मधील पेपर क्रमांक ३ ज्यामध्ये ५०% लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम आहे व ५०% प्रात्यक्षिक परीक्षेचा अभ्यासक्रम समाविष्ट आहे, त्यासाठी एकूण ०४ साधनव्यक्तींना निमंत्रित करण्यात आले, तसेच बीजभाषणासाठी शिवाजी विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विषयाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. एम. ए. कदम-पाटील यांना निमंत्रित करण्यात आले.

कार्यशाळेचा उद्घाटन समारंभ शारीरिक शिक्षण व बी.एस.सी. कॉम्प्युटर सायन्स विभाग असा संयुक्तिक पार पडला. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. अॅड. एन. आर. पाटील (काका) यांच्या हस्ते व के.बी.पी. कॉलेजचे प्राचार्य डॉ. एन.एस. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, शारीरिक शिक्षण अभ्यासमंडळांचे अध्यक्ष डॉ. एम. ए. कदम-पाटील व शिवाजी विद्यापीठ कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या प्रमुख डॉ. के. एस. ओझा, दोन्ही विषयाचे अध्यापन करणारे विविध महाविद्यालयातील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उदघाटन समारंभास शारीरिक शिक्षण विषयाच्या काही विद्यार्थ्यांनी हजेरी लावली.

उद्घाटनानंतर अभ्यासमंडळांचे अध्यक्ष डॉ. एम. ए. कदम-पाटील यांच्या बीजभाषणाने कार्यशाळेची सुरुवात झाली. NEP 2.0 नुसार अभ्यासक्रमाची रचना सुधारित करण्याचे नियम तथा पद्धती तसेच याची गरज व महत्त्व याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. बी. ए. भाग २ या सुधारित अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणानुसार असून विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करून तयार केला असल्याचे सांगून त्यांनी अभ्यासक्रम सुधारित करण्याची संधी जेष्ठ व तज्ञ सहकार्यांच्या मुळे मिळाल्याचे नमुद केले. उपस्थित सर्वांनी सदर अभ्यासक्रम समजून घ्यावा चर्चा करावी व हस्तलिखित नोट्स काढण्याचे त्यांनी सूचित केले.

बी. ए. भाग २ च्या सेमिस्टर ३ मधील पेपर क्रमांक ३ लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम यावर डॉ. रुपाली कांबळे, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली यांनी साधनव्यक्ती म्हणून अभ्यासपूर्ण भाष्य केले. एकूण चार मोड्यूलपैकी १ ले मोड्यूल व त्यातील उपमुद्द्यावर त्यांनी उपस्थितांना जुन्या व सुधारित बदलाबाबत अवगत केले. PPT सादरीकरणाच्या माध्यमातून त्यांनी आपली मते उपस्थितांच्या समोर सादर केली.

मोड्यूल क्रमांक २ मधील अभ्यासक्रमावर एन. डी. पाटील नाईट कॉलेज सांगली च्या डॉ. प्रिया प्रकाश टेळे यांनी साधनव्यक्ती म्हणून PPT च्या माध्यमातून सविस्तर मार्गदर्शन केले.

दुपारच्या जेवणानंतर तृतीय सत्रात जेष्ठ मार्गदर्शक कृष्णा महाविद्यालय रेठरे बु।। (शिवनगर) या कॉलेजचे डॉ संजय पाटील यांनी मोड्यूल क्रमांक २ मधली मुद्द्यांवर साधनव्यक्ती म्हणून PPT च्या माध्यमातून तज्ञ मार्गदर्शन केले.

चौथ्या सत्रात डॉ.एस. ए. हिरुगडे-पवार, कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली यांनी पेपर नं. ३ मधील ४ थ्या मोड्यूल वर लेखी तसेच प्रात्यक्षिक परीक्षा अभ्यासक्रम व मानके याबाबत मार्गदर्शन केले.

शेवटच्या सत्रात खुली चर्चा व शंका निरसन करण्यात आले, उपस्थित शिक्षकांनी अनेक शंका व प्रश्न विचारले त्याचे निरसन करण्यात आले. संबंधित अभ्यासक्रमातील काही भाग नवीन असल्याने त्याबाबत लेखी नोट्सही पुरविण्यात आल्या.

सायंकाळी ५.०० वाजता कार्यशाळेचा समारोप कॉलेजच्या आर्ट्स फॅकल्टी डीन, एस. ए. नांगरे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांच्या हस्ते सर्व सहभागी शिक्षकांना उपस्थिती प्रमाणपत्र, कार्यशाळा प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्वाना सकाळचा चहा, दुपारचे जेवण व सायंकाळचा चहा पुरविण्यात आला. जिमखाना विभाग प्रमुख डॉ. अमितराज माने यांनी आभार मानून कार्यशाळेची सांगता करण्यात आली. एकूण २१ प्राध्यापक उपस्थित राहिले, उपस्थितांनी प्रत्याभरण फॉर्म लिहून दिले.

सदर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी मा. प्राचार्य, मा. उपप्राचार्य, जिमखाना प्रमुख, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर प्रशासकीय सेवक, विभागाचे विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

या कार्यशाळेसाठी निमंत्रक म्हणून कर्मवीर भाऊराव पाटीत कॉलेज, उरूण-इस्लापूर शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख व शिवाजी विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. संदीप पाटील यांनी काम पाहिले.



शारीरिक शिक्षण विभाग नवीन बदलत्या अभ्यासक्रम कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. एन. आर. पाटील (काका) यांचे स्वागत करताना कॉलेजचे प्राचार्य डॉ. एन.एस. शिंदे व इतर



शिवाजी विद्यापीठ कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या प्रमुख डॉ. के. एस. ओझा यांचे स्वागत करताना महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. एन. आर. पाटील (काका) व इतर



शिवाजी विद्यापीठ शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळांचे अध्यक्ष डॉ. एम. ए. कदम-पाटील यांचे स्वागत करताना महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. एन. आर. पाटील (काका) व इतर



शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळांचे अध्यक्ष डॉ. एम. ए. कदम-पाटील उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना




शारीरिक शिक्षण विभाग नवीन बदलत्या अभ्यासक्रम कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थिताना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. अॅड. एन. आर. पाटील (काका)




कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय मनोगत करताना कॉलेजचे प्राचार्य डॉ. एन.एस. शिंदे



कार्यशाळेच्या पहिल्या सत्रातील साधन व्यक्ती प्रा. डॉ. संजय पाटील यांचे स्वागत करताना जिमखाना विभाग प्रमुख डॉ. अमितराज माने, शेजारी प्रा. डॉ. एम. ए. कदम-पाटील




दुपारच्या सत्रात उपस्थितांना विषयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करताना साधन व्यक्ती डॉ. सौ. एस. ए. हिरुगडे –पवार




कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी उपस्थितांना प्रमाणपत्र प्रदान करताना प्रा. एस. आर. नांगरे , प्रा. डॉ. एम. ए. कदम-पाटील



कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्रा. एस. आर. नांगरे

# कार्यशाळेची प्रसिद्धी- बातमी

दैनिक जनप्रवास

## केबीपीत कॉम्प्युटर सायन्स, शारीरिक शिक्षण कार्यशाळा

जनप्रवास । इस्लामपूर

महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठ पुरस्कृत बी.एस.सी भाग २ कॉम्प्युटर सायन्स व बी.ए भाग २ शारीरिक शिक्षण या विषयाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणनुसार बदललेल्या अभ्यासक्रमा संदर्भात एकदिवसीय कार्यशाळा पार पडली.

कार्यशाळेचे उद्घाटन महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अॅड. एन. आर. पाटील यांच्याहस्ते झाले. शिवाजी विद्यापीठ शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. महेंद्र कदम-पाटील व शिवाजी विद्यापीठ कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या प्रमुख डॉ. के. एस .ओझा, कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या प्रमुख प्रा. वंदना पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष अॅड. एन. आर. पाटील मंचावर डॉ. के. एस. ओझा, डॉ. महेंद्र कदम, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे.

कार्यशाळेस सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांचे कॉम्प्युटर सायन्स व शारीरिक शिक्षण विषयांचे प्राध्यापक उपस्थित होते. कार्यशाळा एकूण चार सेशनमध्ये झाली. कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या कार्यशाळेत बीजभाषक कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या प्रमुख डॉ. के. एस. ओझा, साधन व्यक्ती डॉ. के. जी. खराडे, प्रा. जी. पी. मुल्ला यांनी मार्गदर्शन केले. शारीरिक शिक्षण विभागाच्या कार्यशाळेत अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ. महेंद्र कदम-पाटील, प्रा. डॉ. संजय पाटील, डॉ. एस. ए. हिरुगडे-पवार, डॉ. रुपाली कांबळे, डॉ. प्रिया टेळे यांनी नवीन बदलेल्या अभ्यासक्रमासंदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले. आर्ट विभागाचे फॅकल्टी डीन प्रा. संतोष नांगरे यांच्याहस्ते सर्व सहभागी प्राध्यापकांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. कॉम्पुटर सायन्स विभागाचे पी. एन. पाटील, प्रा. पी. एम. मोरे, प्रा. के. आर. ठाकरे यांनी संयोजन केले. पूजा कुपाडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संदीप पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अमितराज माने यांनी आभार मानल

सांगली । ▪गुरुवार, दि. २८ ऑगस्ट २०२५ ९

तरुण भारत

## 'केबीपी'मध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरणांवर कार्यशाळा

प्रतिनिधी
इस्लामपूर

महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठ पुरस्कृत बी.एस.सी भाग २ कॉम्प्युटर सायन्स व बी.ए भाग २ शारीरिक शिक्षण या विषयाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नुसार बदललेल्या अभ्यासक्रमासंदर्भातची एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अॅड.एन. आर.पाटील यांच्या हस्ते तसेच शिवाजी विद्यापीठ शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.महेंद्र कदम-पाटील व शिवाजी विद्यापीठ कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या प्रमुख डॉ. के. एस. ओझा, कॉलेजचे प्राचार्य डॉ.नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ.पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य डॉ.संदीप पाटील, कॉम्पुटर सायन्स विभागाच्या प्रमुख प्रा.वंदना पाटील यांच्या प्रमुख उपस्थित झाले.

अॅड.एन.आर.पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना आपण सूचवलेल्या नवीन



इस्लामपूर : कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी बोलताना अॅड.एन.आर.पाटील, डॉ.के.एस ओझा, डॉ.महेंद्र कदम-पाटील, प्राचार्य डॉ.नितीन शिंदे व इतर.

अभ्यासक्रमाचा भविष्यात त्यांच्या करिअरमध्ये फायदा व्हावा व नोकरीच्या निमित्ताने त्यांना त्यातून अधिक संधी निर्माण व्हाव्यात या दृष्टीने आपण प्रयत्न करावेत, असे सांगितले.

डॉ.के.एस.ओझा यांनी कॉम्प्युटर सायन्स या विषयांमध्ये एआयच्या माध्यमातून नवीन जे काही बदल सूचवले जात आहेः त्याचा सर्व क्षेत्रांना फायदा होत असून आज ते बदल सर्वजण स्वीकारत आहेत. प्रत्येक क्षेत्रामध्ये कॉम्प्युटर सायन्स त्या क्षेत्रातील एक अविभाज्य भाग बनत चाललेला आहे.

प्रास्ताविक डॉ. संदीप पाटील यांनी केले. त्यामध्ये या कार्यशाळेच्या आयोजनचा हेतू स्पष्ट केला. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (२०) या अन्वये विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामध्ये काही नवीन बदल करण्यात आलेले असून त्या बदलांचे संबंधित प्राध्यापकांना ज्ञान व्हावे, या अनुषंगाने सदर कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यशाळेसाठी अनुक्रमे सातारा, सांगली व कोल्हापूर या जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांचे कॉम्प्युटर सायन्स व शारीरिक शिक्षण विषयांचे प्राध्यापक उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे कशाप्रकारे सर्व गोष्टींना आपल्यात अंतर्भूत करण्याचा प्रयत्न करत आहे. हे उदाहरणाद्वारे सांगितले ज्याप्रकारे कला शाखेचा विद्यार्थी हा सायन्स किंवा कॉमर्समधील विषयही शिकू शकतो त्यास त्याच्या आवडीनुसार भाग घेता येऊन भविष्यात करिअरच्या दृष्टीने पाहता येण्यास मदत होईल. त्याचबरोबर खेळ आणि कॉम्प्युटर सायन्स या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचेही त्यांनी सांगितले.

शारीरिक शिक्षण विभागाच्या कार्यशाळेमध्ये अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ.महेंद्र कदम-पाटील, प्रा. डॉ. संजय पाटील, डॉ.एस.ए. हिरुगडे-पवार, डॉ.रुपाली कांबळे, डॉ.प्रिया टेळे यांनी नवीन बदलेल्या अभ्यासक्रमासंदर्भात उपस्थिताना मार्गदर्शन केले.

प्रा.संतोष नांगरे यांच्या हस्ते सर्व सहभागी प्राध्यापकांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. आभार डॉ. अमितराज माने यांनी मानले. सूत्रसंचालन पूजा कुपाडे यांनी केले. पी.एन.पाटील, प्रा.पी.एम.मोरे, प्रा.के. आर.ठाकरे यांनी संयोजन केले.

सांगली । ▪गुरुवार, दि. २८ ऑगस्ट २०२५